# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेसनोट क्रमांक ३२२/२०२४ दिनांक- २१/०८/२०२४.

**"Share Market APP" मध्ये ऑन लाईन गुंतवणुक करण्यास सांगून फसवणुक केलेल्या 5,53,851/- रुपयांपैकी 4,80,000/- रुपये रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात काशिगांव पोलीस ठाण्यास यश.''**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्ताल यातील काशिगांव पोलीस स्टेशन परीसरात राहणारे- श्री.ज्युलीयन गौराचंद दलाई, ४७ वर्षे, रा.हाटकेश, मिरारोड पुर्व यांना **"Share Market APP"** मध्ये गुंतवणुक केल्यास अधिक नफा मिळविण्याचे आमिष दाखवून आर्थक फसवणुक झाली होती. सदर फसवणुकीच्या अनुषंगाने काशिगाव पो.ठाणे येथे गुन्हा रजि.नं.ा २१४/२०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३(५) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम सन २००० चे कलम ६६(सी), ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नमूद तक्रारीबाबत तात्काळ गुन्हा दाखल करुन घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता, साक्षीदार यांची रक्कम वेगवेगळ्या बँकखात्यात वळती झाल्याचे दिसुन आले. त्याअनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठविण्याबाबत संबंधीत बँकेसोबत पत्रव्यवहार करून संशयीत खात्यामध्ये रक्कम गोठविण्यात आली. त्यानंतर मा.न्यायालयाकडुन फिर्यादी/साक्षीदार यांची रक्कम परत मिळविण्याकरीता काशिगाव पोलीस ठाणेचे अधिकारी/अंमलदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने साक्षीदार- श्री.ज्युलीयन गौराचंद दलाई, ४७ वर्षे, रा.हाटकेश, मिरारोड पुर्व यांची फसवणुक झालेल्या रकमेपैकी **4,80,000/-** रुपये रक्कम त्यांचे खात्यावर परत मिळविण्यात आली आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- Telegram Channel, facebook, Instagram अथवा Watsapp वर जास्त परतावा देणाऱ्या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
- अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर अॅड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी काही लोकांचे बॅक स्टेटमेंट मध्ये त्यांना फायदा झालेली रक्कम दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात असतो.
- Work From Home नावाखाली Online You Tube Video Like Tasks, Hotel/Movie Ratingया सारख्या गुंतवणुक करण्याऱ्या बनावट जाहिरातींना बळी पडू नये.
- जास्त परतावा अमिष दाखविणाऱ्या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवू नये तसेच ट्रेडींग ॲपची विश्वासार्हता तपासून गुंतवणुक करू नये.

- Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदरआपल्या वित्तीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
- कोणतेही अनाधिकृत ॲप्लीकेशन डाऊन लोड करु नये अथवा अनोळखी लिंक वर क्लिक करु नये.
- ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायद्याने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेचwww.cybercrime.gov.inअथवा 1930 या हेल्प लाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. प्रकाशगा यकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, मिरारोड, श्री. विजयकुमार मराठे, सहा.पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री राहुलकुमार पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक श्री. राहुल सोनवणे, पोहवा/०७१२८ सचिन पाटील यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईनक्रमांक- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट - www.cybercrime.gov.in**

**--------0000---------**